कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २६८ /२०२६ दि. ०२/०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणे वाहतुक विभागाचे कार्यक्षेत्रातील कोपरी वाहतुक उपविभागाचे हद्दीत दहिहंडी उत्सव–२०२६ चे अनुषंगाने श्री. गणेश भिमशा मुकादम, शाखा प्रमुख यांचे वतीने अष्टविनायक चौक, कोपरी, ठाणे पूर्व येथे दि.०५/०९/२०२६ रोजी उपमुख्यमंत्री दहिहंडी उत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर ठिकाणची वाहतूक सुनिश्चित व सुरक्षीत राहणे आम जनतेच्या साईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद – १) कन्हैयानगर, नाखवा स्कुल कडून अष्टविनायक चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आनंद दिघे चौक, मंगला हायस्कुल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने आनंद दिघे चौक येथून सरळ जाऊन नारायण कोळी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद २) सिडको रेल्वे बोगदयाकडून अष्टविनायक चौककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **नारायण कोळी चौक** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग सदरची वाहने नारायण कोळी चौक येथून उजवे वळण घेऊन आनंद दिघे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना **दि.०५/०९/२०२६ रोजी** सकाळी ०७:०० वा पासून ते २२:०० वा पावेतो अमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनास लागु राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा.पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृन्मुंबई/मिरा भाईंदर महानगरपालिका.

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग ठाणे.


Restaurants
Hotels
Things to do
Transit
Parking
Pharmacies
ATMs
ठाणे रेल्वे स्टेशन
Thane Station East
Gajanan Koli Marg
Station Rd
Anand Cinema
Anand Bharti Rd
Dattatreya Parasnis Marg
Acharya Shree Tulsi Chowk
Devendra Patil Rd
Thane East Shr
Siddhivinayak Temple
Station Rd
Vinayak Rd
Ashtavinayak katta tandoor vadapav
Ashtavinayal
Mith Bunder
Advani Chowk
Daulat Nagar Rd
Ashtavinayak Marg
Xtreme Gaming Lounge PC & PS5
Nanji Apartments
नानजी अपार्टमेंट्स
Lokmanya Tilak Path
PES Global CBSE School
Valmiki Marg